


**६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास विनम्र अभिवादन!**

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३१ वा ▶ बुधवार दि. ६ डिसेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

# धुळ्यातील पाच कंदिल मार्केटसह व्यापारी संकुलांवर महासभेत चर्चा

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील पाच कंदिल मार्केटच्या जागेत नविन मार्केट बांधल्यानंतर शहराच्या वैभवात भर पडणार आहे. या मार्केटचे काम तडीस नेण्यासाठी भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकरांनी शर्थीचे प्रयत्न केले. शिवाय त्यांनी दसेरा मैदानची जागाही मनपाला मिळवून दिली. तर विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल यांनी पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करुन ऐतिहासिक टॉवर गार्डनच्या नुतनीकरणाचे काम मार्गी लावले, असे सांगत आजच्या महासभेत सदस्यांनी गजेंद्र अंपळकर व अनुप अग्रवाल यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित केला. शिवाय सदर कामे मार्गी लावण्याठी सकारात्मक कार्यवाही केल्याबद्दल महापौर प्रतिभा चौधरींचेही अभिनंदन केले.

महापालिकेच्या सभागृहात महापौर प्रतिभा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली महासभा झाली. सभेला उपमहापौर वैशाली वराडे, आयुक्त अमिता दगडे-पाटील, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त संगिता नांदुरकर, सदस्य चंद्रकांत सोनार, भगवान गवळी, हिरामण गवळी, सुनिल बैसाणे, हर्षकुमार रेलन, अमोल मासुळे, नरेश चौधरी, नागसेन बोरसे, साबीर पठाण, अमिन पटेल, कमलेश देवरे, देवेंद्र सोनार, नंदु सोनार, वंदना भामरे, कल्याणी अंपळकर, योगिता बागुल आदींसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सभेच्या अजेंड्यावर तीन विषय ठेवण्यात आले होते. यात मनपाच्या मालकीच्या पाचकंदिल भागातील मार्केट नव्याने बांधण्याबाबतच्या दाव्यात काऊंटर क्लेम सादर करणे, महापालिकेच्या पाचकंदिल भागातील चारही मार्केट नव्याने बांधण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे, धुळे शहर मंजुर विकास योजनेतील आरक्षित भुखंड फायनल प्लॉट नं. १५३ या आरक्षित जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल विकसीत करणे या विषयांचा समावेश होता. सदस्य हिरामण गवळी यांनी, भाजपाने मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगडमध्ये बहुमताने विजय मिळविला. याबद्दल त्यांनी पंतप्रधानांसह भाजपाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. यावेळी उपस्थित सदस्यांनी मोदी...मोदी... असा जयघोष करत त्यांच्या ठरावाला समर्थन दिले. याचवेळी हिरामण गवळींनी पाच कंदिल मार्केट व दसेरा मैदानचा मार्गी लावणारे धुळे महानगराध्यक्ष अंपळकर व टॉवर गार्डनच्या कामासाठी पाठपुरावा करणारे अग्रवाल यांच्याही अभिनंदनाचा ठराव मांडला. १०० वर्षांपुर्वीच्या ऐतिहासिक टॉवर गार्डनचा कायापालट होणार असल्याने शहराचे सौंदर्य आणखी खुलेल, असेही यावेळी श्री.गवळी यांनी सांगितले.

### चुकीच्या पध्दतीने करार

मनपा मालकीच्या पाचकंदिल भागातील मार्केट नव्याने बांधण्याच्या दाव्यात कॉउंटर क्लेम ठेकेदारावर करण्याचा विषय क्र.२९९ होता. या विषयावर सुनिल बैसाणे, हर्षकुमार रेलन, नागसेन बोरसे आणि हिरामण गवळी यांनी आपली मते मांडली. या प्रकरणात २३ कोटी रुपये मागत असेल तर आपण काउंटर क्लेम दाखल करावा अशी आग्रही भुमीका हर्षकुमार रेलन यांनी मांडली. सदस्यांनी मांडलेल्या भुमीकेच्या आधारे महापौर चौधरी म्हणाल्या की, चुकीच्या करारामुळे जमिन ठेकेदाराच्या घशात जाते,कुठलेही काम न करता ठेकेदार ३० कोटींचा दावा करतो या मागे कुठेतरी पाणी मुरत आहे.मनपाचा संबंधीत अधिकारी याला जबाबदार असल्याचे महापौरांनी सांगितले.



## ढासळलेल्या पुलामुळे मनमाडकरांना ५ किमी वळसा

**मनमाड ।** पाणीटंचाई, वीजटंचाई, वाहतुकीची गैरव्यवस्था, रस्त्यांवरील खड्डे या सर्व समस्यांचा सामना करणाऱ्या मनमाडकरांच्या अडचणीत ढासाळलेल्या रेल्वे पुलामुळे आणखीनच वाढ झाली आहे. वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याने शहराच्या दक्षिण-उत्तर भागाचा संपर्कच तुटला आहे. दक्षिण व उत्तर भागातील नागरिकांना पाच ते सहा किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. त्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही झाला आहे. ही समस्या कधी सुटणार याकडे मनमाडकरांचे लक्ष लागले आहे.

रेल्वे प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व बीओटी तत्त्वावरील कंपनी यांचे एकमेकांवर दोषारोपण सुरू असतानाच लोकप्रतिनिधींनी चमकोगिरी करीत कार्यकर्ते व नागरिकांसमोर अधिकाऱ्यांविरुद्ध तोंडसुख घेतले खरे. पण, मूळ प्रश्न कायमच आहे. नवीन पूल करा, बायपास करा, रिंगरोडची आखणी करा आदी सूचना केल्या. पण, सध्या भेडसावणारा प्रश्न कोण तातडीने सोडवणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. रेल्वे उड्डाणपूल ढासळल्याने दक्षिण भागातील नागरिकांना पूर्व भागात येण्यासाठी पाच ते सहा किलोमीटरचा वळसा घालावा लागत आहे.

## धुळ्यात बेशिस्त वाहन चालकावर कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी शहरासह जिल्हाभरातील शाळा महाविद्यालयांसमोर टवाळखोरी होवू नये तसेच वाहतुकीचे नियम मोडणार्यांवर चपराक बसावी, यासाठी वाहतूक शाखेसह पोलीस दलास सक्त कारवाईच्या सुचना केल्या आहेत. तसेच संबंधीत कार्यवाहीचा डेली रिपोर्ट दुपारी एक वाजेपर्यंत न चुकता सादर करण्याचे आदेश देखील दिले. त्यानुसार आज शहरासह जिल्हाभरात पोलिसांनी रस्त्यावर उतरून कारवाई केली.

अधिक वृत्त असे की, दिवसेंदिवस होणारे अपघात, महाविद्यालय परिसरात काढली जाणारी विद्यार्थीनींची छेड, भरधाव वेगातील बुलेटवर कर्णकर्कश वाजणारे हॉर्न आदी तक्रारीत




दिवसागणिक वाढ होत आहे. काही दिवसांपुर्वीच देवपूर बसस्थानकात एका टवाळखोराने मुलींसमोर व्हीडीयो रेकॉर्ड करीत अश्लील हावभाव केले. परिणामी, येथील विद्यार्थीनी भयभीत झालेल्या दिसून आल्या. यासंदर्भात संबंधीतावर कारवाई देखील झाली. मात्र असे प्रकार वारंवार घडत असल्याने या सर्व बाबींवर चपराक बसावी याकरीता जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी जिल्हाभरातील पोलिसांसह वाहतूक पोलिसांना कारवाईचे आदेश दिले आहे.

एसपींचे फर्मान सुटताच सकाळपासून कारवाईचा धडाका सुरू झालेला दिसून आला. यात धुळे शहरातील जयहिंद महाविद्यालय परिसरातील काही दुचाकीस्वारांना थांबवून त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांचेकडील लायसन्स, आय.डी. कार्ड आदी गोष्टी तपासण्यात आल्या. दामिनी पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने शाळा-महाविद्यालय परिसर तसेच महिला वस्तीगृह या ठिकाणी ओळखपत्र तपासणे, आवश्यकतेप्रमाणे टवाळखोरांवर कार्यवाही केली. यामुळे कॉलेज परिसरात सन्नाटा दिसून आला.

## अदानींच्या कार्यालयावर ठाकरे काढणार मोर्चा

**मुंबई ।** धारावीचा विकास झालाच पाहिजे, तिथल्या लोकांचे पुनर्वसन झालेच पाहिजे. ही शिवसेनेची आग्रही मागणी आहे. त्यामुळे बीडीडीचा विकास जसा म्हाडा करत आहे, तसा धारावीचा विकास सरकारने करावा, जर टीडीआर बँक करणार असाल तर ती सरकारची असावी, त्यात अदानीचा फायदा नसावा, असे परखड मत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी व्यक्त केले. येत्या १६ डिसेंबरला धारावी ते उद्योगपती अदानींच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. शेतकऱ्यांची अवस्था वाईट आहे. पीक विमा घोटाळा वेगळा विषय आहे. त्यावर बोलेनच. महाविकास आघाडीचे सरकार आले होते. शेतकरी तारला होता. कोरोनाच्या काळात शेतकऱ्यांनी आपली अर्थव्यवस्था तारली होती. थोतांड नाटके बंद करा. कर्जमुक्ती करा. घोषणा करून भुलभुलैय्या करू नका, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

## जि.प सभेत सदस्यांनी प्रशासनास धरले धारेवर

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा मंगळवारी सभासदांनी चांगलीच गाजवली होती. एरवी ठराविक सदस्य सभेत बोलताना दिसायचे. मात्र जनतेची व विकासाची कामे होत नसल्याने न बोलणारे सदस्यही कसे आपले प्रश्र्न पोटतिडकीने मांडताना आक्रमक होतात हे या सभेत पाहावयास मिळाले.

धुळे जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ५ डिसेंबर रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सर्वसाधारण सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष



अश्र्विनी पवार,ह्या होत्या. या सभेत सदस्यांनी जनतेच्या व विकासाच्या प्रश्र्नांवर आक्रमकरीत्या प्रश्र्नांची सरबत्ती केली. अनेक अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे वेळ मारून देणारी उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे प्रश्र्न विचारणारे सदस्य अधिकच आक्रमक झाले. प्रश्र्नाचा भडीमार करून त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलाच धारेवर धरलं. त्यांच्या प्रश्र्नांना उत्तरे देता देता अधिकाऱ्यांची चांगलीच भंबेरी उडाली. पुढील सभेत आमच्या प्रश्र्नांची उत्तरे मिळाली नाहीत तर सभा चालू देणार नाहीत. सभागृहाला टाळेच ठोकू असा स्पष्ट इशारा देत पुढील सभेत अभ्यास करून या अशी तंबीच या सदस्यांनी अधिकाऱ्यांना भरल्याने अधिकाऱ्यांना घामच फुटला होता. सभेत विषय पत्रिकेवरील विषयांवर क्रमानुसार चर्चा करून मंजुरी देण्यात आली.

## राष्ट्रवादीने सुरु केले मी 'महाराष्ट्रवादी' अभियान



**धुळे । प्रतिनिधी**

मी महाराष्ट्रवादी अभियानाचा शुभारंभ आज धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हा निरीक्षक श्री.उमेश पाटील यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला.या वेळी ग्रामीण जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे, शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले, जिल्हा सरचिटणीस प्रा.नरेंद्र तोरवणे उपस्थित होते.

या अभियानाला साथ देण्यासाठी महाराष्ट्रप्रेमी जेष्ठ नागरिक, युवक, महिला-भगिनी,शेतकरी,कष्टकरी बांधव, व्यापारी तसेच नोकरदार बांधव यांनी महाराष्ट्राची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन श्री.उमेश पाटील, ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र मराठे व शहर अध्यक्ष रणजीत राजे भोसले यांनी केले आहे.यावेळी उषा पाटील,गिरीश नेरकर,नरेंद्र तोरवणे,सयाजी ठाकरे,भोला सैंदाणे,राजेंद्र भदाणे,शांताराम पाटील,कल्पेश सोनवणे, दत्तू पाडवी, बाळासाहेब गुजर,व्यंकटेश पाटील,अशपाक सय्यद, रामेश्र्वर साबरे,प्रनव भोसले,राजू मशाल,युसुफ शेख,आकाश बैसाणे आदी पाधाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळवण तालुक्यातील ७७३ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित

**नाशिक ।** तालुक्यात २६ व २७ नोव्हेंबर रोजी विविध भागात झालेल्या अवकाळी पावसामुळे यामुळे द्राक्ष, भात, नागली, वरई, कांदा व रोप, टोमॅटो, सोयाबीन, भाजीपाला आदी पिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार ७७३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतीपिकांचे सरसकट वस्तूनिष्ठ नुकसानीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना तत्काळ मदत करावी, अशी मागणी आमदार नितीन पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री दादा भुसे यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे. तालुक्यात झालेल्या नुकसानीची आमदार पवार यांनी पाहणी केली.

## अवैधपणे दारूची वाहतूक; ट्रकसह मुद्देमाल जप्त

**शिरपूर पोलिसांची कारवाई**

**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर शहर पोलिसांनी कारवाई करत मद्यतस्करांना जोरदार दणका दिला आहे. तालुक्यातील वाडी गावात सापळा रचून आयशर वाहनासह तब्बल ७९ लाखांच्या मद्यसाठा पकडला. शिरपूर शहर पोलिसांच्या या कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचे शिरपूर पोलिसांचे कौतुक केले.

शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ए.एस. आगरकर यांना गुप्त माहिती मिळाली होती की, मध्यप्रदेशातील सेंधव्याहून बोराडी-वाडीमार्गे आयशर वाहन (आर. जे. १९/ जी. एच. ८४८२) येत असुन त्यामध्ये अवैध दारूची चोरटी वाहतूक




होत आहे. त्यानुसार पीआय आगरकर यांनी पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक हेमंत खैरणार यांनी डी. बी. पथकासह वाडी ता. शिरपूर येथे सापळा रचला. त्याचा संशय आल्याने पोलिसांनी या वाहनाचा पाठलाग सुरु केला. त्यामुळे वाहनावरील चालकाने त्याचे वाहन बोराडी गावाचे अलिकडे रस्त्यावर अंधारात उभे केले आणि अंधाराचा फायदा घेत पसार झाला. या कारवाईत ४९ लाख २१ हजार १८० रुपये किमतीचा विदेशी मद्यसाठा व ३० लाख रुपये किमतीचे आयशर वाहन असा एकूण ७९ लाख २१ हजार १८० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पुढील तपास पोनि आगरकर यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि गणेश कुटे हे करीत आहेत.

## महापालिकेचा आर्थिक अत्याचार, घरपट्टी ५५ हजार नोटीस २७ लाखांची

**मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार**

**धुळे । प्रतिनिधी**

महापालिकेने धुळेकरांवरील आर्थिक अत्याचाराची परिसीमा गाठली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सर्वात जास्त मालमत्ता कर वसुल करणारी धुळे महानगरपालिका असल्याचा विक्रम नोंदला गेला आहे. धुळे मनपा आणि राज्यातील इतर मनपा यांना राज्य शासनाची नियम वेगवेगळी आहेत का? असा सवाल करताना ज्यांना ५५ हजार घरपट्टी आहे त्यांना २७ लाखांची नोटीस पाठविण्याचे धाडस मनपा करतेच कशी? २५०० रुपये घरपट्टी असलेल्या मालमत्ता धारकाला ५२ हजार रुपयांचा कर आकारणी होत असेल तर शिवसेना गप्प बसणार नाही, महापौरांनी महासभेत याबाबत




ठराव करावा,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे याबाबत तक्रार करणार असल्याची माहिती महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना शिंदे गटाचे महानगरप्रमुख संजय गुजराथी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत संजय गुजराथी म्हणाले की, अ वाजवी मालमत्ता कर भरण्यासाठी जनतेने आपल्या मालमत्ता खाजगी सावकाराकडे गहान ठेवायच्या का? मालमत्ता करासंदर्भात आणि कर आकारणी संदर्भात कोणतेही तांत्रिक ज्ञान नसलेल्या ठेकेदाराचा ठेका महापालिकेने रद्द करावा, महापौरांनी महासभा घेवून राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार झोनचे दर आणि मालमत्ता कराचे दर ठरवून मालमत्ता कराच्या नव्याने नोटीसा जनतेला द्याव्यात. राज्यातील अ ते ड वर्ग मनपा आणि धुळे मनपाच्या मालमत्ता करामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. मनपा प्रशासन धुळेकर जनतेला मुर्ख समजून आपली तिजोरी भरण्याचे काम करत आहे. नियम धाब्यावर बसविणारी मनपा राज्याबाहेर आहे का? असा सवालही संजय गुजराथी यांनी विचारला आहे. मालमत्ता कर आकारणीच्या ठेक्याचे काम एका वर्षात पूर्ण होवू शकते असे असताना पाच वर्षांसाठी १० कोटी रुपयांचा ठेका दिला गेलाच कसा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शहराबाहेर असलेल्या विराज स्टाईल्सला ५५ हजार मालमत्ता कर होता, आता तो साडेचार लाख रुपये करण्यात आला आहे. करापोटी तब्बल २७ लाखांची नोटीस मनपाने त्यांना पाठविली आहे. देवपुरातील एका मालमत्ता धारकाला २५०० रुपये कर होता त्याला आता ५२ हजार रुपयांची कर आकारणी झाली आहे. कर आकारणीने धुळ्यातील मालमत्ता धारक हवालदील झाले आहे. ठेका दोन वर्षापुर्वी दिला गेला,परंतु त्या आधीपासूनची बिले दिली गेली. महापालिकेत ३१ डिसेंबरपर्यंत भाजपाची सत्ता आहे. महापौर चांगले काम करत आहे,त्यांनी महासभा घेवून ठराव करावा, धुळेकरांची आर्थिक अत्याचारातून सुटका करावी, असे आवाहनही त्यांनी महापौरांना केले आहे. आधी कर वाढवायचा आाणि त्यानंतर सुनावणीचे नाटक करायचे, सुनावणीसाठी सक्षम अधिकारी नेमला पाहिजे. परंतु त्या ऐवजी लिपिकालाच बसविले जाते. मालमत्ता कर प्रकरणी आपण मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेवून धुळेकर जनतेवरील अन्याय दुर करणार असेही संजय गुजराथी म्हणाले,यावेळी त्यांच्या सोबत विजय अग्रवाल, शिकारे आदी उपस्थित होते.

## अतिक्रमण उपायुक्तांना जीवे मारण्याची धमकी

**नाशिक । प्रतिनिधी**

अनधिकृत बांधकाम हटवू नये यासाठी महापालिका अतिक्रमण विभागाचे उपायुक्त नितीन नेर यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुंबई नाका पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित महापालिकेचा सेवानिवृत्त कर्मचारी असल्याची बाब समोर येत आहे.

जुना मुंबई- आग्रा महामार्गावरील कालिका माता मंदिर परिसरातील एका खासगी भूखंडावर संशयिताच्या नातेवाइकाचे अनेक वर्षांपासून अनधिकृत बांधकाम आहे. अनधिकृत बांधकामाविरोधात प्लॉट मालकाने महापालिकेकडे तक्रार अर्ज केला. पाठपुराव्यानंतर तक्रार अर्जावर कारवाई करण्यात आली. नगररचना विभागाने संबंधित अनधिकृत बांधकामधारकाला नोटीस बजावली. स्वतःहून अनधिकृत बांधकाम हटवावे, अन्यथा अतिक्रमण कारवाई करण्याची सूचना देण्यात आली होती. अनधिकृत बांधकामधारकाने महापालिकेच्या सहाय्यक अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त झालेल्या एका नातेवाईकाला ही कारवाई रोखण्याची मागणी केली. संबंधिताने महापालिकेवर कारवाई होऊ नये, यासाठी दबाव आणण्यासाठी प्रयत्न केला.

## केसीआर यांचा मुखभंग

कर्नाटकात आम्ही मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत आश्वासनांची अंमलबजावणी केली, हे काँग्रेसने तेलंगणातील प्रचारात सातत्याने सांगितले. केसीआर सरकारच्या गैरकारभारावरून तो पक्ष रान उठवत राहिला.

तेलंगणमधील मतदारांनी के. चंद्रशेखर राव यांना जोरदार झटका दिला आहे. एवढ्या मोठ्या पराभवाची केसीआर यांनी अपेक्षाही केली नसेल! प्रादेशिक पक्षांची आघाडी उभारून राष्ट्रीय स्तरावर प्रकाशझोत खेचण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेवर तूर्तास पाणी पडले. निकालाआधी कोणी कितीही दावे केले, तरी सर्वसामान्य मतदारांच्या मनात काय आहे हे समजणे कठीण असते. पाच राज्यांच्या निकालाने ते वास्तव अधोरेखित केले आहे. विविध वाहिन्या, संस्था यांनी कथित जनमत चाचण्यांद्वारे काढलेले निष्कर्ष हवेत विरून गेल्याचे चित्र देशाने पाहिले. तेलंगणप्रमाणे मिझोराममध्येही मतदारांनी सत्तारूढ पक्षाला झटका दिला. एकीकडे कल्याणकारी योजनांच्या बळावर शिवराजसिंग चौहान यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मध्य प्रदेशात केवळ सत्ताच राखली नाही, तर दणदणीत बहुमत मिळवून काँग्रेसची धूळधाण उडवली. त्याचवेळी, कल्याणकारी योजनांचा बोलबाला असलेल्या तेलंगणात मतदारांना सत्तारूढ भारत राष्ट्र समितीचा कारभार रुचला नाही, हे लक्षणीय म्हणावे लागेल. कोणतेही सरकार आपापल्या योजनांचा आक्रमक प्रचार करण्यात कमी पडत नाही. केसीआर तर तेलंगणाबाहेर देखील आपल्या राज्यात कसे आलबेल आहे हे अथकपणे सांगत होते. रयत बंधू, रयत विमा, अशा शेतकर्यांसाठीच्या योजना, नवदांपत्यांना मदतीसाठी योजना, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती यांसह असंख्य योजना तेलंगणात त्यांनी आणल्या. मात्र ज्यांच्यासाठी त्या आहेत त्यांच्यापर्यंत त्याचा फायदा पोहोचतो आहे की नाही, याकडे लक्ष देण्यात ते कमी पडले. शेतकर्यांसाठीच्या योजनांचा लाभ केवळ मोठ्या शेतकर्यांना झाला. दहा वर्षे बीआरएस सत्तेत होता. अर्थातच, प्रस्थापितविरोधी लाट हा घटक होता. स्थानिक अस्मितेला साद घालण्यावर केसीआर यांनी प्रचारात भर दिला. स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीत त्यांचा लक्षणीय वाटा राहिला. त्याची आठवण केसीआर प्रचारात सातत्याने करून देत होते. हे वास्तव असले तरी भ्रष्टाचाराच्या सातत्याने झालेल्या आरोपांमुळे त्यांची प्रतिमा डागाळली. केसीआर यांना घेरण्याची एकही संधी विरोधकांनी वाया जाऊ दिली नाही. गजवेल अणि कामारेड्डी अशा दोन मतदारसंघातून राव यांनी निवडणूक लढवली. दोन्ही ठिकाणी काँग्रेस आणि भाजपने त्यांच्या विरोधात प्रबळ उमेदवार दिले. कामारेड्डी मतदारसंघात राव यांना पराभवाची नामुष्की सहन करावी लागली. काँग्रेसने अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला. केसीआर यांनी मुस्लिम धर्मीयांना बारा टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण झाले नाही. यातून अल्पसंख्याकांची मते काँग्रेसच्या पारड्यात गेली. स्थानिक नेतृत्वाला विश्वासात घ्यायचे नाही, ही काँग्रेसची जुनी परंपरा आहे. त्याचा अनेकदा पक्षाला फटका बसला. तेलंगणात काँग्रेसने रेवंत रेड्डी यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला. तेलगु देशममधून काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या रेड्डी यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. रेड्डी यांनी अनेकदा राजकीय भूमिका बदलल्या आहेत. एकेकाळी ते विद्यार्थी परिषदेचेही कार्यकर्ते होते. त्यांचा राजकारणातील प्रवेश तेव्हाच्या तेलंगण राष्ट्र समितीतून झाला. पुढे अपक्ष, त्यानंतर तेलगु देशम आणि आता काँग्रेस अशी वाटचाल असलेले रेड्डी मुरब्बी आहेत. इतर पक्षातील असंतुष्ट त्यांनी सोबत घेऊन केसीआर यांचे आव्हान पार केले. स्थानिक नेतृत्वाच्या बळावर काँग्रेसने कर्नाटक जिंकले. त्याचीच पुनरावृत्ती पक्षाला तेलंगणात करता आली. तो पक्षासाठी आशेचा किरण म्हणावा लागेल. महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये पक्ष विस्तार करण्यासाठी केसीआर धडपडत होते. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेमुळे इंडिया आघाडीमध्ये सामील होणे त्यांनी टाळले. आता काँग्रेसनेच सत्ता हिरावून घेतल्याने आघाडीची दारे त्यांच्यासाठी बंद आहेत. मिझोराममध्ये सत्तेवर येत असलेल्या झोरम पिपल मूव्हमेंटने प्रथमच निवडणूक लढवित राज्याची सत्ता मिळवली हे विशेष. पूर्ण बहुमताने पुन्हा सत्तेवर येण्याचे मिझो नॅशनल फ्रंटचे सर्वेसर्वा झोरामथंगा यांचे स्वप्न भंगले आहे. अनपेक्षित निकाल, हेच पाचही राज्यांतील निवडणुकांचे वैशिष्ट्य ठरले आहे.

# मोदी की 'गॅरंटी'वर जनतेचा विश्वास

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या तीन राज्यांत ज्या दणदणीतपणे भाजपाचा विजय झाला आहे, त्यावरून देशात केवळ 'मोदी की गॅरंटी'च काम करते, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. तीनही राज्यांत भाजपा दणदणीत विजयासह परतला आहे आणि मोदी यांना २०२४ मध्ये टक्कर देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या 'इंडिया' आघाडीचे स्वप्न भंगले. काँग्रेसचे राहुल गांधी यांनी तेलंगणापासून सुरू केलेल्या 'भारत जोडो' यात्रेपासून स्वतःबद्दल माध्यमांच्या मदतीने विश्वास निर्माण केला होता, त्याचा चक्काचूर झाला आहे.

भारतात केवळ एकच गॅरंटी काम करते आणि ती 'मोदी की गॅरंटी' आहे, यावर जनतेचा विश्वास बसला आहे. याचीच परिणती म्हणजे तीन राज्यांतील निकाल आहेत. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे सारेच नेते स्वतःला मोदी यांना पर्याय म्हणून समोर आणण्याच्या तयारीत होते. त्यांचा पार सफाया झाला आहे. तेलंगणाने थोडी फार साथ दिली नसती, तर काँग्रेसला तोंड काढणे मुश्कील झाले असते. 'मोदी की गॅरंटी'मुळे राहुल आणि कंपनीच्या अस्तित्वावरच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. काँग्रेसला राहुल आणि प्रियंका या विजय मिळवून देऊ शकत नाहीत, हे अजून किती काळ काँग्रेसला समजणार नाही, हा एक प्रश्न आहे. राहुल आणि प्रियंका तसेच गांधी घराण्याचे भूत आपल्या मानगुटीवरून फेकून दिल्याशिवाय काँग्रेसला चांगले दिवस येणे अवघड आहे, हे काँग्रेसच्या लक्षात कधी येणार, हा सवाल उपस्थित झाला आहे.

या निकालामुळे लोकसभा निवडणुकीतही मोदी यांच्या विजयाची हॅटट्रिक साध्य केली जाणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे, ही बाब अधोरेखित झाली आहे. काँग्रेसची अवस्था फारच नाजूक झाली आहे आणि आता त्यांना लोकसभेच्या जागावाटपात पूर्वीचे स्थान तर राहिले नाही. उलट इंडिया आघाडीतील इतर घटक पक्ष काँग्रेसच्या वाट्याला जितक्या जागा देतील, तितक्यावर समाधान मानण्याशिवाय काँग्रेसला गत्यंतर नाही. काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर प्रचंड घटली आहे. संपूर्ण निवडणूक प्रचारात मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार प्रहार केले. पण त्यापेक्षाही मोदी यांच्या ताब्यात देश सुरक्षित आहे, यावर जनतेचा जास्त विश्वास होता आणि तो आणखी दृढ



झाल्याचे दिसले. तिन्ही राज्यांत भाजपाला जो लक्षणीय विजय मिळाला, त्यासाठी काही बाबी कारण ठरल्या. म्हणजे मप्रमध्ये 'लाडली' योजना अत्यंत यशस्वी झाल्याचे दिसले. तसेच मोदी यांच्यावर टीका करणारे हे विसरतात की, मोदी यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी जी 'शेतकरी सन्मान निधी' योजना सुरू केली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होत आहे.

जनधन खात्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. नोटाबंदीसंबंधी मोदी यांच्यावर सातत्याने टीका करणारे विसरतात की, याच निर्णयामुळे पाकिस्तान आणि बांगलादेश आज कंगाल झाले आहेत. पाकिस्तानातून खोट्या नोटा येत होत्या आणि त्या आता चलनातून बाद झाल्या आहेत, हे करणे अत्यंत आवश्यक होते. या निवडणुकीत भाजपाने मात्र शिवराज चौहान आणि वसुंधरा राजे यांच्यासारखे दिग्गज असूनही आपला फोकस मोदी की गॅरंटीवर ठेवला आणि त्याचे चांगले फलित भाजपाला मिळाले.

कोणत्याही गोष्टीची गॅरंटी नसते पण 'मोदी की गॅरंटी' हीच तेवढी खरी असते, यावर जनतेनेच शिक्कामोर्तब केले. भाजपाने मोदी की गॅरंटीवर प्रचाराचा भर ठेवला होता आणि त्याचे परिणाम आज तीन राज्ये काँग्रेसच्या ताब्यातून गेली आहेत. तिन्ही राज्यांत एखादा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा समोर आणता आला असता. पण मोदी यांनी मास्टरस्ट्रोक खेळला आणि कुणालाच दावेदार म्हणून समोर केले नाही. परिणामी गटबाजीला काही संधीच राहिली नाही. आता या निकालामुळे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांसमोर काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मोदी आणि शहा यांच्या दुर्दम्य सामर्थ्याशी मुकाबला कसा करायचा, याचा विचार करून आता काँग्रेस नेत्यांना झोप येणार नाही.

राहुल गांधी यांनी आमचा पक्ष 'मोहब्बत की दुकान' चालवतो, यावर प्रचारात जोर दिला होता. पण जनतेने राहुल यांच्या बोगस पोपटपंचीला बंद करून टाकले आहे. जनतेच्या मनात काय असते, हे कुणीच सांगू शकत नाही. जनतेने मूक राहून बोलघेवड्या पक्षांना आणि यांच्या ऊठवळ नेत्यांना चोख उत्तर दिले आहे. इंडिया आघाडीच्या जागावाटप बोलण्यात आता प्रादेशिक पक्षांची दादागिरी वाढण्याची शक्यता आहे. काँग्रेसला या आघाडीचे नेतृत्व करण्याची खुमखुमी होती. पण आता राहुल यांच्याकडे विरोधी आघाडीच्या नेतृत्वाची संधी देणे तर सोडूनच द्या पण काँग्रेसला इंडिया आघाडीत स्थान राहिले तरी पुष्कळ झाले, असे म्हणण्याची पाळी आली आहे.

भाजपाविरोधी माध्यमे इतकी क्षुद्र आहेत की, भाजपाच्या विजयाचे श्रेयही मोदी यांना देण्यास ते तयार नाहीत. पण मोदी मॅजिक ही तीन राज्यांत चालली, हे कुणी नाकबूल केले तरीही ती वस्तुस्थिती आहे. तीन राज्यांत वाईट प्रकारे पराभवास समोरे जावे लागल्यावर आता काँग्रेसला इंडिया आघाडीची आठवण आली आहे. काँग्रेस नेहमीच कुणाशी आघाडी करण्यास तयार नव्हती. पंचमढी ठरावात काँग्रेसने तेच म्हटले होते. पण आता काँग्रेसची अवस्था इतकी खराब झाली आहे की, काँग्रेसबरोबर जाणे म्हणजे आत्महत्या करणे, असे इतर पक्षांना वाटू लागले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तर आपलाच सर्वात मोठा पक्ष आहे, असे म्हणत काँग्रेसला खिजवण्यास सुरुवात केली आहे. मोदी की गॅरंटीने हा चमत्कार घडवला आहे. लोकसभा निवडणुकीत हेच चित्र दिसणार आहे, यात काही शंका नाही. जनतेच्या मनात तरी तेच आहे.

# भारताचा खलनायक

**अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांचे निधन झाले. त्यांची ओळख एक अत्यंत अभ्यासपूर्ण स्कॉलर नेता, परराष्ट्र खात्याचा जाणकार आणि नाझी जर्मनीतून आलेला निर्वासित अशी असली तरीही भारतासाठी मात्र त्याची ओळख भारत-पाकिस्तान युद्धात खलनायकी चाली रचणारा आणि त्यासाठी कोणत्याही थराला जाणारा नेता अशीच आहे. गोष्ट भारत-पाकिस्तान युद्धाची. हे युद्ध होऊ नये म्हणून तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी जंगजंग पछाडले होते. पण पाकिस्तानी अध्यक्ष याह्या खान यांना चुचकारूनही ते युद्धावर ठाम होते. त्यासाठी अमेरिका आणि रशिया यांना यात मध्ये पडावे लागले. इंदिरा गांधी निक्सन याना भेटण्यासाठी गेल्या, तेव्हा त्यांची संभावना अत्यंत गलिच्छ शब्दांत करणारे हेच निक्सन महाशय होते.**

भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाल्यावर या किसिंजर महाशयांनी अध्यक्ष निक्सन यांना सल्ला दिला की, चीनने सीमेवर सैन्य तैनात करण्यासाठी दबाव आणावा. त्यामुळे भारताची एक बाजू कमजोर होऊन भारत युद्ध थांबवेल. किसिंजर हे निक्सन यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार होते. त्यानंतर ते जिराल्ड फोर्ड यांच्या काळातही याच पदावर होते. पण त्यांची भूमिका भारत-पाक युद्धात आणि नंतर काही काळ चर्चेत राहिली. वादग्रस्त अशीच त्यांची भूमिका होती आणि ते संपूर्ण भारतविरोधी होते.

निक्सन आणि किसिंजर हे दोघेही भारताला धमकावण्याचा प्रयत्न करत होते. आधुनिक अमेरिकन इतिहासात किसिंजर हे सर्वात महत्त्वाची व्यक्ती होते. त्यांनीच व्हिएतनाम युद्धाला अमेरिकेला उभे केले. त्यातून त्यांना बदनामीचा सामना करावा लागला. पण त्यांचे खरे काळे कारस्थान भारत पाकिस्तान युद्धात समोर आले. भारताच्या कल्याणाची भाषा करणारा हा माणूस आतून किती खलनायकी आहे, हे त्यावेळी जगाने पाहिले. व्हिएतनाम युद्ध थांबवण्यात प्रमुख भूमिका निभावणारा हा खलनायक भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी भारताच्या संपूर्ण विरोधी होता. त्याला हे युद्ध होणे नको होते. त्यासाठी अमेरिकेने



वाट्टेल त्या मार्गाने याह्या खानचे लांगूलचालन करावे या मताचा तो होता. किसिंजर आणि निक्सन या दोघांनीही त्यावेळेला भारताला धमकावण्याचा एकत्रित प्रयत्न केला होता. जेव्हा इंदिरा गांधी अमेरिकेला भेटण्यास गेल्या, तेव्हा त्यांना बराच काळ ताटकळत ठेवण्यात आले. पण त्यापेक्षा हे महत्त्वाचे आहे की, किसिंजर यांनी निक्सन यांना सल्ला दिला की, चिनी सैन्य सीमेवर तैनात करण्यासाठी अमेरिकेने दबाव आणावा. हा काळ होता शीतयुद्धाचा. अमेरिका आणि रशिया सारखेच ताकदवान देश होते. पण किसिंजर यांचा हा कुटिल डाव चीननेच उधळला. चीनने सीमेवर सैन्य तैनात करण्यास साफ नकार दिला. परिणामी भारताने पाकिस्तानचे तुकडेच पाडले आणि बांगलादेश नावाचा देश अस्तित्वात आला.

किसिंजर यांनी चीनच्या नकारानंतरही एक डाव रचला होता. त्यांनी चिनी अधिकारी हुआंग हुआ यांच्याशी एक गुप्त बैठक ठरवली होती. किसिंजर यांना भारतद्वेषाने इतके पछाडले होते की, त्यांनी रशियाने जर चिनी सीमेवर सैन्य तैनात केले, तर चिनी उपग्रहांवरून आलेली माहिती ते लगेच रशियाला देतील. तोही डाव उधळला गेल्यानंतर किसिंजर या खलनायकाने नवा डाव खेळला. त्यांनी निक्सन यांना बोलून एक भयंकर सल्ला दिला. त्यासाठी त्यांना इतिहास कधीही क्षमा करणार नाही. त्यांनी निक्सन यांना सांगितले की, आपल्या युद्धनौका बंगालच्या खाडीत आणून ठेवाव्यात. हा सारा आटापिटा पाकिस्तानला भारताने हरवू नये म्हणून चालला होता. निक्सन तर संतप्तच होते. त्यांची भाषा भारतीय नेत्यांबद्दल अत्यंत गलिच्छ होती.

१५ डिसेंबर १९७१ हा तो काळा दिवस होता. त्यादिवशी निक्सन यांच्या आदेशावरून अमेरिकेचे सातवे आरमार बंगालच्या खाडीत दाखल झाले. अमेरिकन आरमार निश्चितच भारताच्या दिशने, पण अत्यंत हळू वेगाने सरकत होते. ते पाहिल्यावर रशियाने आपल्या सैन्याला खाडीत जमा होण्याचा आदेश दिला. त्यानंतर अमेरिकन आरमाराने माघार घेतली. हा धोका टळला, पण अमेरिकेची मनीषा चांगली दिसत नव्हती. पण यासाठी दुसरेही एक कारण दिले जाते. भारताचे राजनीतीज्ञ अरूंधती घोष यांनी सांगितले की, पाकिस्तानचे जनरल नियाझी यानी भारताला आम्हाला युद्धबंदी हवी आहे, असा संदेश पाठवला. त्यानंतर अमेरिकन आरमार परतले. जग आज सर्वात विद्वान आणि परराष्ट्र धोरणाचा गाढा अभ्यासक म्हणून ओळखते. किसिंजर यांच्या नावाने अनेक फेलोशिप दिल्या जातात. पण त्यांनी भारत-पाकिस्तान युद्धाचा खरा खलनायक इतकीच ओळख भारतासाठी आहे. नाझी जर्मनीतून आलेला हा विद्वान माणूस राष्ट्राध्यक्षाचा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून पोहोचला. पण त्याने भारतविरोधी भूमिका का घेतली आणि पाकिस्तानचे लांगूलचालन का केले? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

निक्सन यांना जगातील युद्ध थांबवण्यासाठी शांतता दूत म्हणून समोर यावे असे वाटत होते. त्यातून त्यांनी भारतविरोधात जाऊन भारत-पाकिस्तान युद्धात खलनायकाची भूमिका बजावली. पण खरा खलनायक हेन्री किसिंजर हेच होते. असो. आता ते या जगात नाहीत. पण त्यांच्या दुष्कृत्यांची साक्ष देणारा इतिहास, तर पानापानांवर आहे. किसिंजर यांच्या निधनाने त्या काळातील एक दुवा निखळला आहे. किसिजर यांच्या आरमार पाठवण्याच्या भूमिकेनंतर आशियाई सत्ता समतोल बदलून गेला. त्यानंतर आज इतके पाणी पुलाखालून वाहून गेले. मोदी यांच्या सत्तातरांनंतर उपखंडातील स्थिती कमालीची बदलली. भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे आणि किसिंजर यांची अपेक्षा कधीही केली नसेल. आज पाकिस्तानला चुचकारण्याची अमेरिकेला गरज राहिली नाही. त्यामुळे अमेरिकेने पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत बंद केली. पाकिस्तान आज कंगाल झाला आहे. आणि त्यात आता अमेरिका पाकिस्तानकडे ढुंकूनही पाहत नाही.

किसिंजर यांच्या पाकिस्तानवादी धोरणाचे कमालीचे हे अपयश आहे. किसिंजर आणि निक्सन या जोडीने जितका म्हणून भारताचा अपमान केला, त्या प्रत्येक अपमानाचा बदला त्यांना चुकवावा लागला. हा नियतीने उगवलेला सूड होता. म्हणून किसिंजर शंभराव्या वर्षी गेले असले तरीही त्यांना आपण भारताच्या बाबतीत का अपयशी ठरलो, याची खंत वाटत असली पाहिजे. भारताचा उदय झालेला किसिंजर यांना पहावे लागले. जे भारत बांगलादेश युद्ध टाळण्यासाठी निक्सन आणि किसिंजर जोडीने जंगजंग पछाडले, ते तर त्यांना पाहावेच लागले. पण पाकिस्तानचे तुकडेही झालेले पाहावे लागले. अमेरिकेच्या जगभरातील वर्चस्वाला इथूनच धक्का बसायला सुरुवात झाली. भारत-पाकिस्तान यांच्यात नंतर तीन युद्धे झाली आणि त्या त्या प्रत्येक वेळेस पाकिस्तानचा पराभव झाला. अमेरिकेसारखा बलाढ्य देश पाठीशी असूनही पाकिस्तानला पराभव सहन करावा लागला. भारतीय लष्कराचे सामर्थ्य अमेरिकेला आणि त्यांच्या तमाम नेत्यांना पाहावे

## शब्दकोडे-२५३



**आडवे शब्द**

१. तात्काळ, जागच्या जागी ५. मान्य, आवडते ८. हल, जमीन उकरण्याचे अवजार १०. एक सुगंधी वनस्पती १२. अनुमती, मान्यता १४. संन्याशांची राहण्याची जागा १६. थेट, सरळ १७. गुडघ्यावर पुढे सरकणे १९. गव्हाचे पीठ २०. युद्धभूमी २१. अकस्मात २३. सहा आसनी रिक्षा २६. जास्तीत जास्त २७. ताट २९. किंमत ३०. हात ३२. गांधारीपुत्र ३३. नाका ३४. चांगल्यासाठी प्रशंसेचा उद्गार ३५. पळून जाणे ३७. हिंदीत शाई ३९. भीतीने होणारा कंप ४१. च्याबद्दल ४३. तरतूद ४५. डोळे ४६. फटाक्यांची माळ ४७. हुक्की, लहर ४९. आणि ५०. वितरण, बटवडा ५१. टक, दृष्टी ५२. एक छोटे चर्मवाद्य ५४. खाल्लास शिष्टपणा, दिल्यास मूल्य ५५. अंदाज, तर्क ५७. हृदय ५८. औषध ६०. धातूचा धागा ६१. मूल ६२. स्तुती करण्याजोगे ६३. बाज विणण्याची कापडी पट्टी ६४. गणपती ६८. गाय ६९. मलीन, मळलेला ७१. पंकज ७४. पुष्पदल ७५. व्याप, अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू ७७. मध्यस्थ ७८. चर्चा ७९. नामघोष ८०. नृत्यकलेचे दैवत ८१. शिवशंकराच्या गौर वर्णाचे विशेषण

**उभे शब्द**

१. शिव्याशाप २. जबाबदार, करणारा ३. कोलकाताचे विमानतळ ४. पोपट ६. संपुष्टात येणे ७. होडी ८. विंचवाचा डसण्याचा अवयव ९. रम्य, मनोहर ११. गणिका १३. मार्गक्रमण १५. लुटारु, लबाड १८. सेवक, शिष्य २०. सारखा २१. अवस २२. गोष्टी सांगणे २४. मोगऱ्याची एक जात २५. चेष्टा, टिंगल २६. सारा, टॅक्स २८. आपला परका असा भेद ३०. विद्या ३१. प्रजा ३५. प्रतिष्ठा, सामाजिक वजन ३६. दृष्टीभेट ३८. स्वत:ला कमी लेखणे ४०. खोकला ४२. निरर्थक बडबड ४४. प्रचंड ४७. दोरीच्या गाठीचा एक प्रकार ४८. मेहरबानी ५३. चंदनाची वने असणारा पुराणकालीन पर्वत ५४. हमाल ५६. वेदना ५९. छोटे वादळ ६०. संगीतातील लकेर ६१. इकडून तिकडे गेले वारे अशी स्थिती! ६४. रडणे ६५. मृत्यदेवता ६६. ही देवता मूल जन्माला आल्यानंतर सहाव्या दिवशी त्याचे नशीब लिहून जाते असे म्हणतात ६७. चिखल ७०. मनाचा ओढा ७२. माकड ७३. विशेष ७४. पाप ७६. लाकडाची एक उत्कृष्ट जात ७८. मला

## शब्दकोडे-२५२ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

**उभे उत्तर**

१.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.परोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५अ.रास

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# दुबईत होणाऱ्या महाबिझ-२४मध्ये नाशिकच्या उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

### आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांचे आवाहन




**नाशिक । प्रतिनिधी**

गल्फ महाराष्ट्र बिजनेस फोरम ग्लोबल( जीएनबीएफ) तर्फे येत्या नवीन वर्षाच्या २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी दुबईत आयोजित महाबिझ २०२४ या दोन दिवसांच्या औद्योगिक प्रदर्शन मेगा इव्हेंटमध्ये नाशिकच्या उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन नाशिकचे ब्रँडिंग करावे, असे आवाहन अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) चे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी केले आहे.

नाशिकच्या उद्योजकांना महाबिझ- २४ ची माहिती देण्यासाठी आयमा सभागृहात आयोजित बैठकीच्या वेळी पांचाळ बोलत होते. व्यासपीठावर आयमाचे सरचिटणीस ललित बूब, कोषाध्यक्ष राजेंद्र कोठावदे, बीओटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, प्रदीप पेशकर, जीएमबीएफचे अध्यक्ष डॉ. सुनील मांजरेकर, सुधीर रोकडे आदी होते.

दुबईत होणाऱ्या महाबीझ प्रदर्शनात नेटवर्कच्या संधी, ज्ञानाची देवाण-घेवाण, व्यवसायाचे मार्ग शोधण्यासाठी आणि अर्थपूर्ण भागीदारी, व्यवसाय वृद्धी आणि विस्तार, निर्यात वाढीच्या संधी उपलब्ध होणार असल्याने नाशिकच्या उद्योजकांसाठी ही नामी संधी असून त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन आयमा सरचिटणीस ललित बूब यांनी केले.

डॉ.सुनील मांजरेकर यांनी महाबिझच्या पूर्वतयारीसाठी गल्फ महाराष्ट्र फोरम ग्लोबलतर्फे महत्त्वाच्या शहरांमध्ये फिरून उद्योजकांना प्रोत्साहित करण्यात येत असल्याचे आपल्या भाषणात सांगितले. या प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. आम्ही उद्योजकांना प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देतो त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. नाशिकच्या उद्योजकांनी या मेगा इव्हेंटमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन प्रदीप पेशकर यांनी केले आहे. प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी माफक दरात टूरसेवा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन ब्रिजमोहन टूर्सचे संचालक ब्रिजमोहन चौधरी यांनी यावेळी दिले. यावेळी रवींद्र झोपे, प्रमोद वाघ, अशोक ब्राह्मणकर, श्रीलाल पांडे, जगदीश पाटील, श्रीकांत पाटील, विवेक कोल्हटकर, नितीन सस्तकर, अशोक सावंत, जगदीश कुलकर्णी आदींसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**न्यूज कॉलम**

### एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली

**शिरपूर ।** आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यलयातर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली. दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जगभर जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस पाळावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणावरील शिक्षण आणि जनजागृती या उद्देशाने आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालय आणि रेड रिबिन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

---

## फक्त ११ रुपयात पाव भाजी खाण्यासाठी २००० खवय्यांची उसळली गर्दी

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

येथील रथचक्र चौक येथे एका हॉटेल व्यवसायिकाने खवय्यांना आकर्षित करण्यासाठी शक्कल लढवत फक्त ११ रुपयात दोन हजार पावभाजी रात्री उशिरा पर्यंत पावभाजी विकण्याचा इंदिरानगरात उच्चांक गाठला. यामुळे जणू काही पावभाजी उत्सवच सुरू असल्याने मोठी गर्दी उसळली होती.

इंदिरानगर, राजीवनगर येथे पावभाजी विक्रीची जणू काही स्पर्धाच लागली आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पावभाजी विक्रीची दुकाने असल्याने इंदिरानगरचे नाव पाव भाजीनगर असे तर होणार नाहीना अशी चर्चा सुरु आहे. दि.३ रोजी स्वस्तातील दर्जे दार पावभाजी घेण्यासाठी रात्री उशिरापर्यंत खवय्यांनी रांगा लावून पावभाजी खाण्यावर एकच ताव मारला. एक दिवस उत्सव असल्याने या पावभाजीची चर्चा सर्वत्र पसरल्याने काल दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची पावभाजी घेण्यासाठी तोबा गर्दी उसळली होती.

---

**जाहिर नोटीस** दि. ४/१२/२०२३

तमाम लोकास श्री. किरण रमेशचंद टाटीया राहणार साक्री ता. साक्री. जि.धुळे यांच्या कडुन जाहिर नोटीसीने कळवणेत येते की श्री. सुवालालजी नथमलजी कोठारी तर्फे चेअरमन दिलीप सुवालाल कोठारी राहणार साक्री यांच्या खुद मालकीची मिळकत साक्री ता. साक्री, जि. धुळे येथील साक्री मौजे साक्री, ता. साक्री नगरपंचायत साक्री जि. धुळे हद्दीतील अनुक्रमांक शिवारातील गट क्रमांक १३७/१३८/४२ क्षेत्र अकृषीक क्षेत्र बिनशेती २.२४ आकारणी ३० रुपये म्हणजेच मिळकतीचे वर्णन गट नंबर १३७/१३८ प्लॉट नंबर ४२ जागेचे क्षेत्र २४१० चौ.मी. ही स्थावर मिळकत मी नोटीस देणार किरण रमेशचंद टाटीया रा. साक्री यांनी कायम विकत घेणेचा सौदा केला आहे वरील वर्णनाच्या मिळकतीवर कोणाचा हक्क अधिकार कब्जा, हीतसंबंध बोजा, वाटणी तारण गहाण इत्यादी संबंध असेल त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत मला नोटीस देणार यास स्वतः अगर वकीला मार्फत भेटावे वरील मुदतीत कोणाचीही हरकत अगर तक्रार न आल्यास वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार केला जाईल मुदतीत हरकत न आल्यास कुणाचेही काहीही म्हणने नाही असे गृहीत धरणेत येईल कळावे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस प्रसीध्दीस दिली असे.

**जाहीर नोटीस देणार**
श्री. किरण रमेशचंद्र टाटीया साक्री, जि.धुळे

सदरची जाहिर नोटीस आमच्या मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

**ॲड. श्री. टि.व्ही.पाटील**
ॲडव्होकेट साक्री, जि.धुळे

---

## डॉ.विशाल गुंजाळ यांची महाराष्ट्र आयएमएच्या सहसचिवपदी निवड

**नाशिक । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन नाशिक शाखेचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ यांची इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्रचे सहसचिव म्हणुन नियुक्ति झाली आहे. नुकत्याच अमरावती येथे झालेल्या वार्षिक संमेलनामध्ये डॉ. गुंजाळ हे बिनविरोध निवडून आलेत. बर्याच वर्षानंतर नाशिक मधून राज्यस्तरावर पद भूषवणारे डॉ. गुंजाळ हे नाशिक आयएमएचे सर्वात तरुण अध्यक्ष आहेत.



डॉ. गुंजाळ हे स्पाइन स्पेशलिस्ट असून नाशिक पेन केअर सेंटरचे संचालक आहेत. तसेच केटीएचएम महाविद्यालयाचे माजी विभागप्रमुख डॉ.बाळासाहेब गुंजाळ यांचे ते चिरंजीव आहेत. विविध प्रकारच्या वेदना तसेच मणक्याचे आजार दूर करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून त्यांनी अनेक रुग्णांवर उपचार केले असून अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी पेन मॅनेजमेंट या विषयावर व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांना इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच मराठा विद्याप्रसारक समाज व नाशिक डिस्ट्रिक्ट क्रिकेट एसोसिएशन, सार्वजानिक वाचनालयचे पदाधिकारी तसेच मित्रवर्ग यांच्याकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

---

### एलसीबीने जुगार उधळला; १० जण ताब्यात

**नाशिक ।** शहरातील चाळीसगाव चौफुलीजवळील एका हॉटेल लॉजिंगमधील बंद खोलीत रंगलेला जुगार एलसीबीने छापा टाकत उधळला. पोलिसांनी दहा संशयितांना ताब्यात घेतले, मात्र हॉटेलचालक फरारी झाला. संशयितांकडून कार, दुचाकीसह सुमारे नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. धुळे शहरातील चाळीसगाव चौफुलीजवळील हॉटेल कुणाल श्रीकृष्ण लॉजिंग येथे एका बंद खोलीत हॉटेलचालक गणेश शिंगाडे त्याच्या देखरेखीखाली ५२ पत्त्यांच्या कॅटवर स्वतःच्या फायद्यासाठी जुगाराचा खेळ खेळत व खेळवत असल्याची माहिती एलसीबीचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (ता. ३) मध्यरात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे छापा टाकला. तेथे जुगार खेळताना दहा जण मिळून आले. हॉटेलचालक गणेश शिंगाडे पसार झाला.

---

## छावा क्रांतिवीर सेना नाशिक उपजिल्हा प्रमुखपदी मंगेश बर्गे

**सिडको । प्रतिनिधी**

छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक करण गायकर यांच्या आदेशानुसार कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेल्या छावा क्रांतिवीर सेनेच्या नाशिक उपजिल्हा प्रमुखपदी मंगेश बर्गे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांना नाशिक जिल्हा प्रमुख आशिष हिरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.



मंगेश बर्गे हे विविध माध्यमातून विविध राजकीय, सामाजिक, सार्वजनिक उपक्रम राबवित आहेत. तसेच अनेक आंदोलन, निवेदन, रास्तारोको करून त्यांनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. हे सर्व लक्षात घेऊन नाशिक जिल्हा प्रमुख आशिष हिरे यांच्या मार्गर्शनाखाली त्यांची निवड करण्यात आली आहे.

आगामी काळात ग्रामपंचायत, जिल्हा परिषद तसेच लोकसभा, विधानसभा या निवडणुका लक्षात घेऊन छावा क्रांतिवीर सेना नाशिक जिल्ह्यात विस्तृतपणे विस्तार करून शाखा स्थापन करून तसेच सामाजिक हिताचे प्रश्न सोडणार आहेत.

यावेळी प्रदेश महासचिव शिवाजी राजे मोरे, कार्यअध्यक्ष विजय वाहुळे, युवक प्रदेश सरचिटणीस नवनाथ शिंदे, ग्रामीण जिल्हा अध्यक्ष नवनाथ वैराळ, नाशिक शहर अध्यक्ष योगेश गांगुर्डे, कामगार आघाडीचे दिनेश नरवडे, ज्ञानेश्वर कोतकर, सुदर्शन हिरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

---

## १ जानेवारीला वर्धापन दिनासंदर्भात छावा क्रांतिवीर सेनेची नाशिक जिल्हा प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

संजीवनी बँक्वेट हॉल नांदूर नाका या ठिकाणी एक जानेवारी रोजी होणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील छावा क्रांतिवीर सेनेच्या दहाव्या वर्धापन दिनाच्या संदर्भात प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीसाठी नाशिक, त्रंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, येवला, निफाड, नांदगाव, मालेगाव, देवळा, सटाणा, कळवण, दिंडोरी तसेच नाशिक शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. नाशिक जिल्हा हा येणाऱ्या दहाव्या वर्धापन दिनाचा आयोजक जिल्हा असल्याने वर्धापन दिनाच्या संदर्भात पूर्वतयारीच्या आढावा बैठकीचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने येणारा वर्धापन हा ऐतिहासिक भव्य दिव्य करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. त्याचबरोबर तालुका निहाय बैठका घेऊन जास्तीत-जास्त शाखेचे उद्घाटन कसे होईल, सभासद संख्या कशी वाढेल, त्याचबरोबर नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवड लवकरात लवकर करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लवकर तालुका निहाय जिल्ह्याचा दौरा करून संघटना वाढीसाठी प्रयत्न करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

त्याचबरोबर मराठा आरक्षण, शेतकरी, कामगार, सहकार या क्षेत्रामधील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी येणाऱ्या वर्धापन दिनात भूमिका घेण्यात यावी असा ठरावही एक मताने बैठकीत मंजूर करण्यात आला. वर्धापन दिनासाठी विशेष अतिथी म्हणून कोणाला निमंत्रित करायचे यासाठीही सर्वांनी सूचना द्याव्यात. तसेच आपल्या परिचयातील समाज घटकातील मान्यवरांना या अधिवेशनासाठी निमंत्रित करण्यासाठी एक कमिटी गठीत करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्यभरातील सर्व जिल्ह्यातून येणाऱ्या पदाधिकाऱ्यांना गैरसोय होणार नाही तसेच शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी १० वर्धापन दिन संघटनेचा असावा यासाठी ठिकाण लवकरात लवकर ठिकाण निश्चित करून त्याची माहिती इतर जिल्ह्यांना द्यावी असे आवाहनही करण्यात आले. यावेळी सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छावा क्रांतिवीर सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नाशिक जिल्ह्यात अवकाळीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईच्या मदतीसाठी, वाढती महागाई, बेरोजगारी, मराठा आरक्षण यासारख्या विषयांवर आक्रमकपणे आंदोलने, निवेदन, मोर्चे काढून सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी काम करा. संघटनेचे विचार तळागाळातील घटकापर्यंत पोहोचविणे हे आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे आणि ती सगळ्यांनी यशस्वी करून दाखविण्यासाठी येणाऱ्या काळात प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही आवाहन छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केले आहे.

---

### अंबड परिसरातून दोन मुलींचे अपहरण

**सिडको ।** अंबड परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी दोन मुलींना कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत त्यांचे अपहरण केल्याप्रकरणी अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अपहरणाचा पहिला प्रकार चुंचाळे येथे घडला. फिर्यादी यांची मुलगी घरी होती. त्यावेळी अज्ञात इसमाने या मुलीला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत तिचे अपहरण केले. बराच वेळ होऊनही मुलगी घरी आली नाही म्हणून अंबड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. अपहरणाचा दुसरा प्रकार अंबड लिंक रोड येथे घडला. फिर्यादी यांच्या मुलीस अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत तिचे अपहरण केले. बराच वेळ होऊनही मुलगी घरी आली नाही म्हणून तिचा सर्वत्र शोध घेतला; मात्र ती मिळून आली नाही. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाची फिर्याद नोंदविण्यात आली असून, या दोन्ही प्रकरणांचा तपास अनुक्रमे पोलीस हवालदार चव्हाण व सहाय्यक पोलीस निरीक्षक उगले करीत आहेत.

---

## अंत्यविधीचे अविरतपणे कार्य करणाऱ्या पाटील अंथरुणाला खिळून



### पालकमंत्र्यांची रात्री उशिरा निवासस्थानी धाव

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहराचे वैभव असलेल्या रणरागिणी सूनिताताई पाटील या आजाराने ग्रस्त असून अंथरुणाला खिळून पडल्याची माहिती नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांना मिळताच त्यांनी रात्री त्यांच्या निवास स्थानी भेट घेत तबियतीची विचारपूस केली. पंचवटी अमरधाममध्ये अंत्यविधीचे अविरतपणे कार्य सुरू ठेवणाऱ्या सुनीताताई पाटील गेल्या अडीच महिन्यांपासून पक्षवात आजाराशी लढा देत आहेत.

या महिलेने करोनाकाळात आणि त्यापूर्वी अनेक वर्षांपासून निरपेक्ष वृत्तीने काम केले. ही रणरागिणी आजारी असल्याची माहिती मिळताच नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी रात्री उशिरा त्यांची भेट घेवून त्यांना सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे सांगितले.

पालकमंत्री भुसे यांनी रात्री नऊ वाजेच्या सुमारास अमरधाम येथे त्यांच्या राहत्या घरी भेट देऊन मेंदू रोग तज्ञ डॉ. राहुल बाविस्कर यांच्याशी चर्चा करून त्यांच्यावर उपचार करण्याची विनंती केली. पाटील यांची परिस्थिती सामान्य असल्याने वेळेत उपचार घेता येत नसल्याची माहिती वर्तमानपत्रातून पालकमंत्री यांनी वाचली होती.

---

प्रोसेज जमा　　　　ॲड. राहूल बी. जाधव
नि.६

**जाहीर नोटीस**
**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अ.नं.४००/२०२३

१) श्री. किशोर देवीदास भामरे, वगैरे-　　　　... अर्जदार

॥ विरुध्द ॥

कोणीही नाही　　　　...जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप नर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. ०१ / १२ /२०२३ रोजी अर्ज दाखल कलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ३ एकमेकांचे बहिण भाऊ आहेत तसेच मर्जदार नं. ४ मयताची आई आहे. व अर्जदारांची आजी आजी आहे. कै. लताबाई देवीदास भामरे हे रोजी मौजे पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे येथील रहिवाशी होते त्यांचा मृत्यु दि. २६/०४/२०२२ रोजी मौजे पिंपळनेर . साक्री जि. धुळे येथे झालेला आहे. वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते/संबंध |
|---|---|
| १) श्री. किशोर देवीदास भामरे | - मुलगा |
| २) सुनंदा देवीदास भामरे | - मुलगी |
| ३) श्री. प्रविण देवीदास भामरे | - मुलगा |
| ४) गंगुबाई महादु ध्यानिस | - आई |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय ठणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अ ल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. १६/०१/२०२४ रोजी बकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन**　(शिक्का)　**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, साक्री**　　**दिवाणी न्यायालय, साक्री**

---

नि.६

**जाहीर नोटीस**
**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

कि. दि. अर्ज. क्र. १३९६/२०२३

१) रजनाबाई दगडु पाटील उ.वय.:-६८, वर्ष, कामधंदा-घरकाम
२) भागवत दगडु पाटील उ.वय.:-४३, वर्ष, कामधंदा-शेती
३) बापु दगडु पाटील उ. वय.:- ४०, वर्ष, कामधंदा-शेती
अर्जदार क्र १ व ३ रा.नगाव ता.जि.धुळे　　... अर्जदार

॥ विरुध्द ॥

कै. दगडु दीपा पाटील (मयत) मृत्यु दिनांक २०/०५/२०२३
मुत्यु ठिकाण नगाव ता जि धुळे　　...सामनेवाला

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट तखखख १८२७ कलम २ व ७ अन्वये कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर. यांचे न्यायालयात दि०१/१२/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं १३९६/२०२३ दाखल केलेला आह कै. दगडु दीपा पाटील हे मयत झाल्यानंतर त्याचे वारस डिक्लेर घोषित होवुन मिळण्यासाठी अर्जदार यानी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे अर्जदार याना वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच महसुल दप्तरी, नगर भूमापन कार्यालयात सदर वारस दाखला अर्जदार याना मयताचे कायदेशीर वारस आहेत असे घेषीत होवुन मिळण्यासाठी वर नमुद सदरचा अर्ज मे कार्यालयात लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी न्यायालयत दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १९/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर कोर्ट नं. ४, न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०४/१२/२०२३　　　　आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**　(शिक्का)　**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**　　**दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

---

# आजार अन् तणाव मुक्तीसाठी योगा आवश्यक : चंद्रशेखर पाटील

### क्रां.नाईक संस्थेत योगिक हिलिंग कार्यशाळा

**नाशिक । प्रतिनिधी**



**शाळा बाह्य विविध कामांसह इतर कारणांनी शिक्षकांना देखील अनेक शारीरिक , मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेप्रमानेच नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालयात अशा प्रकारच्या कार्यशाळा घेण्यात येणार आहे. जेणे करून शिक्षक तणाव मुक्त होऊन अधिक चागल्या प्रकारे उद्याची पिढी घडवता येईल.**

**- संजय नागरे, कार्यक्रमाचे संयोजक अध्यक्ष , उत्तमानंद बहुउद्देशीय संस्था**

भीतीमुळे कमी होऊन रोगप्रतिकार शक्ती कमी होते. त्यामुळे अनेक आजार अन् तणावाला देखील सामोरे जावे लागते. सर्वच रोगांवर कीवा जीवनातील कोणत्याही चांगल्या वाईट प्रसंगावर मात करण्यासाठी योगा, आत्मविश्वास अन् इच्छाशक्ती हा महत्वपूर्ण असा उपाय असल्याचे मत मुंबई येथील राजयोग स्पिरिच्युअल हीलिंग व वेलफेअर ट्रस्टचे मास्टर स्पिरिच्युअल हिलर चंद्रशेखर पाटील यांनी व्यक्त केले.

क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेत शनिवारी (दि. २) रोजी उत्तमानंद बहुउद्देशीय संस्थेच्या विद्यमाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गासाठी यौगिक हीलिंग कार्यशाळा उत्साहात झाली. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष ड.पी.आर गिते, विश्वस्त दामोधर मानकर, शिक्षणाधिकारी मोहन चकोर, उत्तमानंद बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष, कार्यक्रमाचे संयोजक संजय नागरे उपस्थित होते. पाटील यांनी सांगितले की योगिक हिलिंग हे एक प्राचीन भारतीय शास्त्र आहे. वैयक्तिक उपचार,शरीरातल्या पेशींचे पुनरुत्पादन,डोळ्यांचे व शरीराचे कायाकल्प याबाबत उपयुक्त मागदर्शन केले. निसर्गाशी जुळवून घेऊन शरिरातील ऊर्जे चे संतुलन,मानसिक व शारिरिक आरोग्याचा समतोल,मनाचे सक्षमीकरण, चेतन व अवचेतन मनाच्या शक्तींचा वापर करणे, शरीरातील चक्रे (ऊर्जा केंद्रे) सक्रिय करणे, शरीराभोवतीची आभा विशुद्ध करणे, पाचनतंत्र मजबूत करण्यासाठी योगिक क्रिया, चेतन आणि अवचेतन मनाची सक्रियता, आत्मविश्वास व स्मरणशक्ती वाढवणे आदींबाबत प्रात्यक्षिक करून दाखविली. शेवटी उपस्थितानी प्रातिनिधिक स्वरूपात आलेले अनुभव सांगितले. कार्यक्रमास सेवक प्रतिनिधी एम.के. वाघ, प्राचार्य डॉ.संजय सानप, प्राचार्य डॉ.कैलास चंद्रात्रे,प्राचार्य डॉ.अविनाश दरेकर,प्राचार्य माणिक काकड, मुख्याध्यापक घोलप मुख्याध्यापिका सरला सानप,अविनाश दरगोडे,भाऊसाहेब सांगळे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### कडधान्य खरेदीला ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ

**धुळे ।** मोहाडी जिल्ह्यात खरीप हंगाम २०२३-२०२४ मध्ये केंद्र सरकारने किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत निश्र्चित केलेल्या हमीभावाने मका, ज्वारी, बाजरी व रागी खरेदीस ऑनलाईन पोर्टलवर नोंदणीसाठी ३० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती. आता ही नोंदणी प्रक्रिया करण्यासाठी रविवार, ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी एस.बी.सोनवणे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

### अवकाळी नुकसानीचे पंचनामे करा!

धुळे । शिंदखेडा तालुक्यातील वसमाणे व लोहगाव येथे अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करून भरीव मदत द्यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांनी दिला आहे. अवकाळी पावसामुळे वसमाणे व लोहगाव येथे केळी, पपई व कापुस यासह पिकांचे नुकसान झाले आहे. याबाबत माहिती मिळाल्यावर शानाभाऊ सोनवणे यांनी २ डिसेंबर रोजी वसमाणे व लोहगाव येथील शेतीत जाऊन पाहणी केली.

# सुदृढ आरोग्यासाठी आहारात तृणधान्याचा वापर करावा: तडवी

### जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**



**विजयी स्पर्धक**

**समुह लोकनृत्य स्पर्धा नर्मदाबाई नागो चौधरी महाविद्यालय, कुसूंबा ता.जि.धुळे यांना प्रथम, यशवंत इग्रंजी स्कुल, नेर ता.जि.धुळे यांना द्वितीय तर एस.एस.व्ही.पी.एस महाविद्यालय,धुळे यांस तृतीय पारितोषिक मिळाले. वैयक्तिक लोकगीत स्पर्धेत विशाल वाघ प्रथम, सौरभ गुरव द्वितीय तर कविता अहिरे तृतीय पारितोषिक. रांगोळी स्पर्धेत विकासरत्न सरकार साहेब रावल कृषि महाविद्यालय, दोंडाईचा प्रथम तर कृषि महाविद्यालय, धुळे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. पोस्टर स्पर्धेत गौरी मुरकुटे प्रथम, निकिता पाटील द्वितीय, उज्वला सोनवणे तृतीय तर फोटोग्राफी स्पर्धेत हर्षदा पाटील प्रथम, लितिशा चौधरी द्वितीय तर जिया जैन यांना तृतीय पारितोषिक मिळाले. कथालेखन स्पर्धेत शुभम जाधव प्रथम, संदीप भामरे द्वितीय तर शैफाली जवराळ हीला तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच वकृत्व स्पर्धेत शैफाली जवराळ प्रथम, जयश्री पाटील द्वितीय तर उज्वला सोनवणे हिला तृतीय पोरितोषिक मिळाले. सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवराच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.**

युवकांनी आपले आरोग्य सदृढ, निरोगी ठेवण्यासाठी आहारात ज्वारी, बाजरी, सावा, नागली अशा पौष्टीक तृणधान्याचा वापर करावा. तसेच तृणधान्य वापर वाढीसाठी युवकांनी जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी केले.

जिल्हा क्रीडा कार्यालय, धुळे तसेच जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आज चावरा इंग्लिश मेडीयम स्कुल, धुळे येथे जिल्हास्तर युवा महोत्सव आज उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री.तडवी ते बोलत होते. या महोत्सवाला प्रमुख पाहुणे चावरा इंग्लिश मेडीयम स्कुलचे प्राचार्य सी जीन फादर, तालुका क्रीडा अधिकारी, एम.के.पाटील, क्रीडा अधिकारी रेखा पाटील, कृषि महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.जे. एस.सुर्यवंशी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विलास कर्डक तसेच चावरा इंग्लिश स्कुलचे शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री.तडवी म्हणाले की, आज क्रीडा विभाग, कृषि विभाग व चावरा स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. शासनाने क्रीडा व कृषि विभाग या दोन्ही महोत्सवाची सांगड घातली असून खेळ म्हटले की साधारणत: इनडोअर आणि आऊटडोअर असे खेळ खेळण्यात येतात. परंतू हे खेळ खेळण्यासाठी खेळाडूंना आहाराचे विशेष महत्व असते. त्यामुळे आहारतज्ज्ञ हे नेहमी सांगतात की, सकाळ, दुपार व रात्रीचे जेवण हे विहीत वेळेत घ्यावेत. आज बहुतांश कुटूंबात शुगर, ब्लड फ्रेशर सारखे आजार कमी वयात जडत आहे. याला कारण आपली आहाराची बदललेली जीवनशैली होय. आहार कमी न करता आपल्या शरीराला आवश्यक जीवनसत्वाचा पुरवठा झालाच पाहिजे. आहारतज्ज्ञ नेहमीच सांगतात की, गहु, भाताचे कमी प्रमाणात सेवन केले पाहिजे त्याऐवजी ज्वारी, बाजरी व नागली यांचे सेवन करावे. पुर्वी आपण मोठ्या प्रमाणात ही पिक घेत होतो. कालांतराने वाढती लोकसंख्या व बदलती जीवनशैलीमुळे यापिकांचे उत्पादन आता कमी प्रमाणात घेत असून आपण दररोजच्या आहारात गव्हाचे जास्त सेवन करीत आहे. ज्वारी, बाजरी, सावा, नागली, भगर यात अनेक पौष्टीक जीवनसत्व आहे. त्यामुळे युवकांनी आपल्या आहारात तृणधान्याचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रारंभी कार्यक्रमाचे उद्धटन चावरा इंग्लिश मेडीयम स्कुलचे प्राचार्य सी जीन फादर यांच्या हस्ते संपन्न झाले. युवा महोत्सवात सांस्कृतिक समुह लोकनृत्य, वैयक्तिक सोलो लोकनृत्य, समुह लोकगीत, वैयक्तिक सोलो लोकगीत, कौशल्य विकास अंतर्गत कथालेखन, पोस्टर स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, फोटोग्राफी तसेच तृणधान्य उत्पादन वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. आभार प्रदर्शन तालुका क्रीडा अधिकारी एम.के.पाटील यांनी केले. तर सुत्र संचलन प्रा.संदीप बाविस्कर यांनी केले. या वेळी कृषि विभागामार्फत विविध स्टॉल लावण्यात आले होते. या महोत्सवास परिक्षक प्रा.मुधकर पाटील, प्रा.सदाशिव सुर्यवंशी, प्रा.रत्नाताई पाटील, श्री.गजेंद्र पाटील, राज वाघ, दुर्गेश बारसे, क्रीडा कार्यालयातील गौरव परदेशी, योगेश देवरे, मदन गावित, योगेश पाटील, ज्ञानेश्र्वर जाधव तसेच कृषि विभाग व चावरा इंग्लिश स्कुलच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.



## पीडित वसंत पावरा यांची प्रकृती गंभीर; पोलिस अधीक्षक धिवरे यांच्याशी चर्चा

**धुळे । प्रतिनिधी**

दंगलीच्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरू असल्याचा आरोप करून रविवारी (ता. ३) विषप्राशन केलेल्या वसंत पावरा यांची प्रकृती अद्याप गंभीर आहे. चोवीस तास उलटूनही ते शुद्धीवर आलेले नाहीत. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवल्याची माहिती बिरसा फायटर्सच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

बिरसा फायटर्स संघटनेचे तालुकाध्यक्ष वसंत पावरा यांनी ३ डिसेंबरला सकाळी शेतात विषप्राशन केले होते. त्यापूर्वी त्यांनी एक व्हिडिओ क्लिप आणि एका पोलिस अधिकाऱ्याशी संभाषणाची ऑडिओ क्लिप प्रसारित करून सांगवी पोलिसांकडून दंगलीच्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप केला होता. विषप्राशन केल्याने त्यांची प्रकृती गंभीर झाली. त्यांच्यावर धुळे येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोमवारी (ता. ४) त्यांच्या प्रकृतीत चढ-उतार झाले. ते अद्याप व्हेंटिलेटरवर आहेत. दरम्यान, बिरसा फायटर्सचे संस्थापक अध्यक्ष सुशीलकुमार पावरा, प्रदेशाध्यक्ष मनोज पावरा, विभागीय अध्यक्ष विलास पावरा व पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (ता. ४) पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांची भेट घेतली. त्या संदर्भातील काही कागदपत्रेही त्यांनी श्री. धिवरे यांना दाखविली. पोलिस अधीक्षक धिवरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले, की या प्रकरणात न्यायपूर्ण कार्यवाही केली जाईल. मात्र आत्महत्येच्या प्रयत्नासारखा आततायीपणा करू नका. दंगलीच्या गुन्ह्याबाबत पोलिस निःपक्ष कार्यवाही करतील. संघटनेच्या आरोपात तथ्य आढळल्यास निश्र्चितच कठोर भूमिका घेऊ, कोणाचीही गय करणार नाही. पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांची समजूत घालून घातक मार्ग अवलंबण्यापासून रोखावे, असे आवाहन श्री. धिवरे यांनी केले.

## धुळ्याचे ऋत्विक ठाकूर यांची नेटबॉल पंच अधिकारीपदी नियुक्ती

**धुळे । प्रतिनिधी**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या वतीने १९ वर्षे आतील मुले व मुलींची राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दि. १९ ते २१ नोव्हेंबर २०२३ दरम्यान होत आहेत.

सदर स्पर्धेसाठी धुळे जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशनचे राष्ट्रीय खेळाडू ऋत्विक ठाकूर यांची पंच अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. सदरची नियुक्ती महाराष्ट्र अँम्युचर नेटबॉल असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडाधिकारी अविनाश टिळे, एम के पाटील, रेखा पाटील, राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. विपीनभाई कामदार, सचिव डॉ. ललीत जिवानी, सहसचिव शाम देशमुख, मा. नगरसेवक विनायक शिंदे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आर व्ही पाटील, धुळे जिल्हा न्यु हौशी सेपक टाँकरा असोसिएशनचे अध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष अविनाश वाघ, कला व क्रीडा शिक्षक समन्वय समितीचे अध्यक्ष हेमंत भदाणे, सचिव राहूल एच पाटील, धुळे जिल्हा नेटबॉल असोसिएशनचे सचिव योगेश वाघ, महेंद्र गावडे, शितल वाघ यांनी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केले.

## मोराणे प्र.ल.सेवा सोसायटी चेअरमनपदी हंसराज सुर्यवंशी

### व्हा.चेअरमनपदी सौ. विमलबाई ठाकरे

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मोराणे प्र.ल.येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन आणि व्हा.चेअरमन पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. चेअरमनपदी श्री हंसराज निंबा सूर्यवंशी तर व्हा.चेअरमनपदी सौ.विमलबाई भास्कर ठाकरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली.

नवनियुक्त पदाधिकार्यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी धुळे शहर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष बापू खैरनार,बाजार समितीचे संचालक ऋषी ठाकरे,वसंत सुर्यवंशी,मयूर ठाकरे,विलास ठाकरे,रमेश पारधी,दगा कोळी,विशाल ठाकरे, ज्ञानेश्वर खैरनार,किशोर पाटील,गणेश पवार आदी उपस्थित होते. यावेळी आ.कुणाल पाटील यांनी नवनियुक्त चेअरमन व व्हा. चेअरमन यांचे अभिनंदन केले आहे.

## दादा लाड कापूस तंत्रज्ञान व विषमुक्त शेती वर पिळखेडा येथे मार्गदर्शन

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



ग्रामविकास गतीविधी धुळे जिल्हा व कृषी विज्ञान केंद्र धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दादा लाड कापूस तंत्रज्ञान व विषमुक्त शेती विषयावर पिळखेडा जि धुळे येथे शेतकऱ्यांच्या साठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते.

यावेळी भालचंद्र कानडे यांनी शेतीची माती व मातीतील जैविक घटकांचे महत्व सांगत शेती शाश्र्वत करायची असेल तर माती जिवंत ठेवा असे संगितले.दादा लाड कापूस तंत्रज्ञान च्या प्रोजेक्ट चे यश चा आवाहल सांगितला तर दादा लाड यांनी या तंत्रज्ञानाचा फायदा व माहीत सांगितली व पुडील वर्षी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.यावेळी दत्तनाथ जी योगी महाराज प्रमुख मठ गुरू गोरक्षनाथ आखाडा दक्षिणमुखी मारुती पिलखेडा,साहेबचंद जैन,जगदीश काथेपुरी,संजय चौधरी,धीरज धनगर,पुंडलिक चित्ते, व भारतीय किसान संघाचे कार्यकर्ते व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## बभळाज येथील आर. सी. पटेल विद्यालयात अँम्बिशन क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील बभळाज येथील आर. सी पटेल माध्यमिक विद्यालय येथे बभळाज क्लस्टर-अँम्बिशन क्रीडा स्पर्धा अंतर्गत अँथलेटिक्स मैदानी स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन थाळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि. प. सदस्य सौ. बेबीबाई पावरा, पंचायत समिती सदस्य सौ. रेखाबाई जाधव, बभळाज सरपंच जगन्नाथ महाजन, लोकनियुक्त सरपंच सौ. योगिता जाधव, माजी पंचायत समिती सदस्य दर्यावसिंग जाधव, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष अजमल जाधव, अजनाड गावाचे सरपंच दरबारसिंग जाधव, तोंदे गावाचे सरपंच राहूल चौधरी, तरडी गावाचे सरपंच गयभू पाटील, लक्ष्मण पाटील, रविंद्र जाधव, वि. का. सोसायटी चेअरमन डॉ. बाळकृष्ण महाजन, जयपाल राजपूत, किशोर पाटील, बळीराम जाधव, पोलीस पाटील नितीन जाधव, विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. ए. कुरेशी, प्राचार्य आर एन. पवार, व्ही.आर. सुतार, सी. जी. पाटील, ए. एच. जाधव, अनेक मान्यवर उपस्थित होते. बभळाज क्लस्टर क्रीडा स्पर्धा दि. ४ व ५ डिसेंबर रोजी बभळाज आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर घेण्यात आल्या. या स्पर्धेत संस्थेतील खंबाळे, भोरखेडा, असली, पिळोदा, होळनांथे व बभळाज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण ७१२ खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एस. ए. कुरेशी यांनी केले. सूत्रसंचालन आर. पी. जोशी यांनी केले व आभार सचिन शिरसाठ यांनी मानले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस पदी प्रा नरेंद्र तोरवणे

**साक्री । प्रतिनिधी**



साक्री तालुक्यातील नूतन मराठा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे नुकतेच सेवनिवृत झालेले प्राचार्य तथा साक्री येथील अंगणवाडी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष विविध सामाजिक व राजकीय चळवळीत कृतिशील सहभाग घेतात.पक्षाचे एकनिष्ठ पदाधिकारी आल्यामुळेच त्याच्या या कार्याची दखल घेत प्रा नरेंद्र तोरवणे यांची धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना नुकतेच धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धुळे जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक उन्मेष पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र मराठे, धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रणजित राजे भोसले, धुळे जिल्हा राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षा उषा पाटील,धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे अध्यक्ष सयाजीराव ठाकरे, साक्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष गिरीश नेरकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देत अभिनंदन करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी साक्री तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष कल्पेश सोनवणे, दिलीप पवार, शिंदखेड्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते डॉ.शांताराम पाटील, धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक आघाडीचे अध्यक्ष राजेंद्र भदाणे, शिरपूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दत्तु पाडवी, शिरपूर येथील जेष्ठ नेते व्यंकटेश पाटील, भोला सैंदाणे, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक आघाडीचे अशपाक सैय्यद यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आदि मोठ्या संखेने उपस्थित होते.

## श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह म्हणजे मानवतेचे मंदीर

### प्रा.अमेय सुनिल महाजन यांचे प्रतिपादन

**धुळे । प्रतिनिधी**




आम्ही शेकडो किलोमीटर वरुन आलो. पण येथील मानवतेचे मंदीर पाहून आम्हाला थकवा जाणवला नाही. येथील शिक्षक या संस्थेचे ब्रॅण्ड म्बेसेडर असून या मानतवेच्या मंदीरात होणारी सेवा समाजाशी जोडण्याची गरज आहे. शिक्षण, संस्कृती व आधुनिकतेचा संगम असलेली ही संस्था राज्यासाठी संशोधन केंद्र बनले पाहिजे. संवदेनशिलता ही समाजाची गरज असून ती निघून गेली तर समाज बोथट बनतो म्हणून या मानवतेच्या मंदीरात होणारी सेवा समाजाशी जोडली गेली पाहिजे. येथील वाघ बंधू व शिक्षक यांचे प्रयत्न कौतुकास्पद असून त्यांच्या प्रयत्नांना समाजाचे अधिष्ठान नक्की मिळेल असे प्रतिपादन मुंबई येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या किर्ती महाविद्यालयाचे प्रा.अमेय सुनिल महाजन यांनी साक्री रोड वरील यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ संचलित श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह व कार्यशाळा येथे कर्मचाऱ्यांसोबत खुला संवाद साधतांना संस्था बळकटीकरण, नेतृत्व कौशल्य आणि आपली भूमिका याविषयावर मार्गदर्शन करतांना केले.

प्रारंभी दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात बोलतांना संस्थेचे प्रमुख आधारस्तंभ सुनिल भाऊ वाघ यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.

मतिमंद मुलींचे पालकत्व घेणे ही संवेदनशिलताच असून ही समाजापर्यंत पोहचली पाहिजे, समाजाला जाणिव करुन देत जागृती करावी. हे काम एकट्याचे नाही. टीम म्हणून परिणामकारकता वाढविली पाहिजे. आपण कामाचा वसा चालू ठेवा. महिलांचे सक्षमीकरण ही गरज असून आम्ही संस्थेला यासाठी सर्वो तपरी मदत करु असे आश्र्वासन दिले. ए.बी.पी माझा चे जिल्हा प्रतिनिधी धनंजय दिक्षीत आपल्या भाषणात म्हणाले; वाघ बंधूंची संस्था ही धुळ्याची ओळख असून समाजाचे काही देणे लागते या भावनेतून संवेदना जपणे ही काळाची गरज असून अशा संस्थांसाठी समाजाने घेते न राहता देते राहण्याची भूमिका स्विकारली पाहिजे. उपस्थित सर्व पाहुण्यांनी मतिमंद मुलींशी संवाद साधला. संस्थेचे कामकाज, धडपड पाहुन भारावले. कर्मचाऱ्यांसोबत खुला संवाद साधत आगामी उपक्रमाविषयी चर्चा केली. कार्यक्रमास संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य गोपीदादा लांडगे, संस्थेचे मार्गदर्शक भरत वाघ, मयूर वाघ, निखिल वाघ, हिरल वाघ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमा निकम यांनी केले व कविता पाटील यांनी आभार मानले.

## महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला स्वच्छता मोहीम

**सिडका । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला नाशिक मनपा माध्यमिक विद्यालयाच्या वतीने पाथर्डी फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
धुळे - नागपूर, अमरावती, अकोला
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
लगेज व पार्सलची उत्तम व्यवस्था
डेली सर्व्हिस - सांगली, सातारा, कोल्हापूर
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
बुधवार दि. ६ डिसेंबर २०२३





# नाशिकचा वाढणारा नावलौकिक अभिमानास्पद: मंत्री भुजबळ

## ६७ व्या राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धांचे शानदार उद्घाटन संपन्न

























नाशिक । जिल्ह्यातील अनेक खेळाडूंनी विविध खेळ प्रकारांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे क्रीडानगरी म्हणून नाशिकचा नावलौकिक वाढत आहे ही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, क्रीडा उपसंचालक रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, स्कूल गेम फडरेशन ऑफ इंडियाचे निरीक्षक के. एस. मूर्ती, कनक चतूर्धर, अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू कविता राऊत यांच्यासह देशातील विविध राज्यांचे खो खो खेळाडू उपस्थित होते.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
बुधवार दि. ६ डिसेंबर २०२३





# धुळ्यात हजारो भाविकांनी घेतले कालभैरवाचे दर्शन

## महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप















धुळे।
येथे श्रीकालभैरव जयंती मंगळवारी उत्साहात साजरी झाली. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. दिवसभरात हजारो भाविकांनी श्रीकालभैरवाचे दर्शन घेतले. एकविरादेवी मंदिरात शमीच्या झाडाखाली पुरातन श्रीकालभैरव मंदिर आहे. कालभैरव जयंतीनिमित्ताने मंगळवारी सकाळी ८ वाजता पूजापाठ, अभिषेक करण्यात आला. तसेच शहरातील पाच स्वामीसमर्थ सेवा केंद्रातर्फे सामूहिक कालभैरव अष्टकाचे पठन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ११ वाजेच्या सुमारास ११ कालभैरवांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दरम्यान कालभैरवांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच मंदिरामध्ये भाविकांची रिघ लागलेली होती. मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. दिवसभरात हजारो भाविकांनी कालभैरवांचे दर्शन घेतल्याची माहिती एकविरा देवी रेणुकामाता मंदिर ट्रस्टचे मुख्य विश्र्वस्त सोमनाथ गुरव यांनी दिली.

संकलन : दिपक वाघ